# एम.बी.मोरे महीला महाविदयालयातील विदयार्थ्यीनींची क्लेरियंट कंपनीत शैक्षणिक भेट

धाटाव येथील एम.बी.मोरे फाउंडेशन संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविदयालयातर्फे प्रथम वर्ष विज्ञान वर्गाच्या विदयार्थीनींनी शनिवार दि.१४/०९/२०१९ रोजी रोहा एम.आय.डी.सी.परिसरातील 'क्लेरियंट केमिकल्स इंडीया प्रा.लि.' मध्ये भेट दिली.

या औदयोगिक क्षेत्र भेटीमध्ये एकूण ४६ विदयार्थीनी आणि महाविदयालयाच्या विज्ञान विभागातील प्रा.सुनिता पाटील व प्रा.पुनिमा भोईर यांनी सहभाग घेतला.या भेटीमध्ये क्लेरियंट कंपनीमधील प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया करणारा विभाग, कच्चा माल व उत्पादनाचे स्टोअर रूम, अभियांत्रिकी कक्ष, अग्निशमन विभाग, कंपनीचा स्वतंत्र उर्जा पुरवठा विभाग, कर्मचारी नियंत्रण कक्ष, कर्मचारी संरक्षण विभाग इ.विभागांचे काम समजावून घेतले. सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कामाबद्दल माहीती घेत असताना त्यांना असणारी शिस्त आणि त्यांचे पर्यावरण संरक्षणाबाबतचे धोरण देखील विदयार्थीनींना या भेटीमुळे समजले.क्लेरियंट कंपनीचे अधिकारी डॉ.श्री.शैलेश नकाते डॉ.श्री.सुनिल दळवी सौ.करिष्मा म्हात्रे यांनी विदयार्थ्यीनी तपशिलवार माहीती दिली.

या उपक्रमाचे नियोजन महाविदयालयाचे प्राचार्य श्री.हणमंत ढवळे आणि विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. प्रसन्न म्हसळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.




Scanned by CamScanner